# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 14/08/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

## मौजा खैरगाव शिवारात जुगार अडयावरधाड
## पोलिस स्टेशन नरखेड ची कार्यवाही

दिनांक 13/08/2021 रोजी पोलिस स्टेशन नरखेड चे पथक हे पो.स्टे. नरखेड परिसरात पेट्रलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, काही इसम हे मौजा खैरगाव शिवार येथे जुगार खेळत आहे. त्यावरून पोलिस स्टेशन नरखेड चे पोलिस पथकाने दिनांक 13/08/2021 चे 17:55 वा. सुमारास मौजा खैरगाव वर्धा नदीचे बाजुला छापा घातला असता आरोपी नामे क्र. 1) प्रफुल विष्णुजी बनाईत, वय 23 वर्ष, 2) राजेंद्र मोतीराम बनाईत, वय 40 वर्ष, रा. दोन्ही खैरगाव व 4 फरार हे 52 तासपत्त्यांवर हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळून आले. आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांच्या कडून 500/–रु. रोख रक्कम, 4 मोटारसायकल किमती 1,47,000/–रू. व असा एकुण कि. 1,47,500/– रू. चा मुद्देमाल मिळून आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार साहेबराव मसराम पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 12 मुंबई जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोलिस नाईक गजानन शेंडे मो. क्र. 9011046672 हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री नागेश जाधव यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. गिरासे, पोलीस उपनिरीक्षक श्री. भासले, पोलिस हवालदार साहेबराव मसराम, पोलिस नाईक गजानन शेंडे, पोलीस शिपाई हेमंत बाबुलकर यांनी पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर